# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 12 March 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- लातूरची मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी तसंच जालन्याच्या गतीशक्ती टर्मिनलचं लोकार्पण
- देशभरातल्या प्रतिभावंत क्रीडापटूंसाठीच्या कीर्ती योजनेची घोषणा

आणि

- खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर संघाला सर्वसाधारण विजेतेपद

****

भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन झालं असून रेल्वेचा विकास हा सरकारच्या प्रमुख प्राधान्यांपैकी एक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधानांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे अहमदाबाद–मुंबई वंदे भारत एक्सप्रेसच्या शुभारंभासह रेल्वेच्या विविध उपक्रमांची पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचंही यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं. या रेल्वे कोच फॅक्टरीमध्ये रेल्वे आणि मेट्रो कोचसह वंदेभारत रेल्वे कोचसुद्धा तयार होणार आहेत. लातूर शहराजवळ चिंचोलीराववाडी इथे नवीन एमआयडीसी परिसरातल्या ३५० एकर जागेवर ही मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी उभारण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला मुंबईतून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

दक्षिणमध्य रेल्वेनं जालन्याजवळ दिनेगाव इथं उभारलेल्या 'गती शक्ती कार्गो टर्मिनल'चंही पंतप्रधानांनी आज लोकार्पण केलं. जालना इथं केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या सुविधेमुळे मराठवाड्यातल्या शेतकऱ्यांचा शेतमाल थेट विदेशात जाईल, तसंच जालन्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

दरम्यान, जालना रेल्वे स्थानकावर तयार करण्यात आलेल्या कोच देखभाल सुविधा –पिटलाईनचं उद्या सकाळी उद्घाटन केलं जाणार आहे.

****

पंतप्रधानांच्या हस्ते आज भूमिपूजन आणि लोकार्पण झालेल्या प्रकल्पांमध्ये राज्यातल्या एकूण ५०६ प्रकल्पांचा समावेश आहे. यामध्ये १५० एक स्थानक एक उत्पादन दुकानं, १७० इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग सिस्टम, १३० सौर पॅनेल, १८ नवीन रेल्वेमार्ग आणि रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण किंवा गेज रुपांतरण, १२ गुड्स शेड, सात स्वयंचलित सिग्नलिंग प्रणाली, चार गती शक्ती कार्गो टर्मिनल, तीन विद्युतीकरण प्रकल्प, बडनेरा इथली वॅगन दुरूस्ती कार्यशाळा, पुणे इथली वंदे भारत बोगी देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, पाच जनऔषधी केंद्रं, चार रेल कोच रेस्टॉरंट यांचा समावेश आहे.

****

दरम्यान, आज राजस्थानातल्या पोखरण इथे भारत शक्ती या कार्यक्रमाचं पंतप्रधानांनी अवलोकन केलं. या कार्यक्रमात देशाच्या तीनही संरक्षण दलांच्या स्वदेशी शस्त्र प्रणालींची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. पोखरण आज पुन्हा एकदा भारताच्या स्वयंपूर्णतेचा साक्षीदार बनलं आहे, अशा शब्दात पंतप्रधानांनी सेनादलांचा गौरव केला.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, पीएम सूरज या राष्ट्रीय पोर्टलचा शुभारंभ करणार आहेत. पी एम सूरज ही एक सामाजिक सशक्तीकरण योजना असून, यातून, देशाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या वंचित समाजघटकांच्या विकासासाठी विविध सुविधा पुरवण्यात येणार आहेत. देशभरातल्या ५२५ जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येणार असून याच्या सुरुवातीच्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या मुंबई, नागपूर, सिंधुदुर्ग,

नाशिक, धुळे, सोलापूर, अहमदनगर, हिंगोली आणि चंद्रपूर या नऊ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

****

देशात नागरिकत्व सुधारणा कायदा – सीएए लागू करण्यात आला असून, पात्र व्यक्तींना नागरिकत्वासाठी अर्ज करण्याकरता केंद्रीय गृहमंत्रालयानं इंडियनसिटिझनशिपऑनलाईन डॉट एनआयसी डॉट इन, पोर्टल सुरू केलं आहे. इच्छुक व्यक्तींना ॲपवरूनही अर्ज करता यावा, यासाठी सीएए-२०१९ हे मोबाईल ॲपही लवकरच कार्यान्वित होणार असल्याचं गृहमंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

दरम्यान, या कायद्याला आव्हान देणारी याचिका इंडियन युनियन मुस्लीम लीगनं सर्वोच्च न्यायलयात दाखल केली आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीला तातडीनं स्थगिती द्यावी अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

****

भाजपचे नायब सिंह सैनी यांनी आज हरियाणाचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल बंडारू दत्तात्रेय यांनी सैनी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मनोहरलाल खट्टर यांनी आज राज्यपालांची भेट घेऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. यामुळे त्यांचा जननायक जनता पक्ष आणि भारतीय जनता पक्ष यांच्यातली साडेचार वर्षांची युती संपुष्टात आली आहे.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते वसंत मोरे या पक्षातून बाहेर पडले आहेत. समाज माध्यमावर एक संदेश देत त्यांनी याबाबतची माहिती दिली.

****

सामाजिक न्याय विभागाच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचं आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वितरण करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. मागच्या चार वर्षातले ३९४ पुरस्कार आज प्रदान करण्यात आले.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी

newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १४ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन अॅट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. प्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर यांनी नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी आज त्यांना आदरांजली अर्पण केली जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपआपल्या निवासस्थानी चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सातारा जिल्ह्यात कराड इथे यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली वाहिली. विधान भवनातही महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे आणि डॉक्टर विलास आठवले यांनी चव्हाण यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

****

केंद्रीय क्रीडा मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांनी आज 'खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन' अर्थात कीर्ती योजनेची घोषणा केली. विविध क्रीडा प्रकारातल्या प्रतिभावान युवा खेळाडूंचा देशाच्या सगळ्या भागांतून शोध घेणं, हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं ठाकूर यांनी सांगितलं. प्रतिभावान खेळाडूंच्या निवडीसाठी शास्त्रीय चाचण्या आणि निकष ठरवले जाणार असून, देशात केवळ महिला खेळाडूंना प्रशिक्षण देणारी दोन केंद्रं सुरू करणार असल्याची माहितीही ठाकूर यांनी दिली.

****

राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीनं उदगीरच्या तालुका क्रीडा संकुलात पार पडलेल्या स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर जिल्हा संघानं सर्वसाधारण विजेतेपद मिळवलं. पुणे आणि सातारा संघ उपविजेतेपदाचे मानकरी ठरले.

****

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२३ अंतर्गत बीड जिल्ह्यातल्या एकूण ८६ महसूल मंडळात सोयाबीन पिकासाठी अग्रीम मंजूर करण्यात आला आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यात २४१ कोटी रुपयांपैकी २३७ कोटी रुपयांचं वाटप लाभार्थींच्या खात्यात करण्यात आलं आहे. यातल्या सुमारे साडेतीन हजार लाभार्थींची बँक खाती आधारशी जोडलेली नसल्यामुळे सुमारे पावणेतीन कोटी रुपये लाभार्थींच्या खात्यात वर्ग होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे, ज्या शेतकऱ्यांना सोयाबीन विमा अग्रिम मिळाला नसेल त्यांनी संबंधितांशी संपर्क साधावा आणि आपलं आधारपत्र बँक खात्याशी संलग्न करुन घ्यावं, असं आवाहन जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मंगल कार्यालयाच्या मालक तसंच चालकांनी लग्नकार्य आणि शुभ प्रसंगांमध्ये मतदारांना मतदान करण्याची शपथ द्यावी, असं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी केलं आहे. नांदेड जिल्ह्यात मतदानाबाबत विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे, त्याचा एक भाग म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी हे आवाहन केलं आहे.

****

मुंबईत पश्चिम बोरिवली इथे एका पंचवीस मजली निर्माणाधीन इमारतीच्या सोळाव्या मजल्यालगतच्या लोखंडी सांगाड्यावरून पडल्यामुळे तीन कामगारांचा मृत्यू झाला तर अन्य एक कामगार गंभीर जखमी झाला. आज दुपारी एकच्या सुमाराला हा अपघात झाला.

****